माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक: १६५/२०२०**

| **तक्रारकर्ता** | **प्रतिवादी** | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपीलीय अधिकारी** |
| श्री. युवराज दौलत शेंडे, रा आंबेडकरनगर, वार्ड, नं. ३, महादुला ता. कामठी जि. नागपूर | कर निर्धारण अधिकरी, नगरपंचायत महादुलाता. कामठी जि. नागपूर | मुख्याधिकारी, नगरपंचायत महादुला ता. कामठी जि. नागपूर |

**सुनावणी दिनांक २४.०२.२०२५**

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. १७७४/२०१९ संदर्भात दिनांक ०८.०७.२०२० रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारीवर दिनांक २२.०२.२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यानंतर आज दिनांक २४.०२.२०२५ रोजी पुनश्च: सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा कर अधिक्षक, श्री. गोसावी गणेश संभाजी उपस्थित असून प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. १७७४/२०१९ मध्ये दिनांक ०८.०७.२०२० रोजी सुनावणी घेवून पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

" तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणावर दिनांक २०.०७.२०१८ रोजी माहिती दिलेली असल्याने पुनश्च माहितीचे प्रदान केले नाही. अपिलार्थी हे शब्दांची हेराफेरी करुन वारंवार एकच माहिती मागत असल्याने त्यांना या प्रकरणात माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांचा सदर खुलासा मान्य करण्यात येत आहे. परंतू जन माहिती अधिकारी यांनी प्रत्येक माहिती अर्जावर विहीत मुदतीत प्रतिसाद देणे आवश्यक आहे. सबब, आज अपिलार्थी यांनी आयोगासमक्ष उपस्थित केलेला मुद्दा लक्षात घेता विद्यमान जन माहिती अधिकारी, नगर पंचायत, महादुला यांनी सदर आदेश प्राप्त होताच अर्जदारास विनामुल्य नोंदणीकृत डाकेने घर १०१ ची फेरफार होवून १०१/१ व १०२/२ अशी ज्या कागदपत्रांच्या आधारे करण्यात आले, त्याबाबतची माहिती द्यावी." असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले होते.

उपरोक्त आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत दिनांक ०३.०९.२०२० (प्राप्त दिनांक ०९.०९.२०२०) रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये "गैरअपिलार्थी नमुना "अ व ब" मध्ये मागितलेली माहिती न दिल्याने व चुकीची माहिती दिल्याने माझे समाधान न झाल्याने आपणाकडे अपील दाखल करावी लागली. या संदर्भात दिनांक २४.०१.२०१९, दि. २४.०४.२०१९ आणि गैरअपिलार्थीने सुनावणीसाठी दिलेली

दिनांक ०७.०७.२०२० या तारखेकडे लक्ष दिल्यास संबंधीत माहिती अधिकाऱ्याने मागितलेली माहिती देण्यात दिरंगाई केली, हे दिसून येते व वारंवार एकच माहिती मागितल्याचे सांगून मला मानसिक त्रास दिला आहे. माझी दिशाभूल केली आहे आणि मला माहिती देण्याच्या मुलभूत अधिकारापासून वंचित ठेवले आहे. दिनांक ०३.०९.२०२० रोजी राज्य माहिती आयोग येथून मला फोन आला व मी ५.०० वाजता भेट दिली. मला सांगण्यात आले की, तुम्हाला २०१८ ला माहिती मिळाली आहे. तुम्ही माहितीचे पैसे भरले आहे. अपिलार्थी यांनी १०१/१ व १०१/२ असे झाल्याचे दाखविले. १०१/२ ची फेरफार केव्हा व कोणत्या आधारे करण्यात आली. माहितीचे आधारे दस्ताऐवज मिळाले नाही. अर्जासोबत पैसे भरल्याची पावती झेरॉक्स व पत्र जोडले आहे. कृपया याकडे लक्ष दयावे ही प्रार्थना व आग्रहाची विनंती आहे." असे नमुद करुन तक्रार अर्ज सादर केला आहे.

सदर तक्रारीसंदर्भात सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता यांना ग्रामपंचायत कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आलेली आहे. मात्र, तक्रारकर्ता यांच्या तक्रार अर्जात १०१/२ ची फेरफार कशाच्या आधारावर करण्यात आली, याबाबतची माहिती मिळाली नाही, असे नमुद केले आहे. परंतु सदर फेरफार कशाच्या आधारावर करण्यात आली, याची माहिती ग्रामपंचायत कार्यालयाकडे उपलब्ध नाही. तसेच सन २०११-१२ मध्ये कर निर्धारण नोंद आहे. परंतु ती नोंद कोणी केली ते दस्ताऐवज उपलब्ध नाही, असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान स्पष्ट केले. आज रोजी तक्रारकर्ता अनुपस्थित असल्याने त्यांना कोणती माहिती मिळाली अथवा नाही, याचा बोध होत नाही. तसेच तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीबाबत लेखी युक्तीवाद सादर केला नाही. त्यामुळे सदर प्रकरणी पुढील कोणतीही कार्यवाही अपेक्षीत नसल्याने प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढणे क्रमप्राप्त ठरत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक: २४.०२.२०२५

जा.क्र. 1885 दि. 28 MAR 2025

E:\तक्रार क्र. 57/2024.docx